# शहर पोलीस स्टेशन पोलिस निरीक्षक यांचा जाहीर निषेध; मेडिकल अहवाल प्राप्त गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ


(छाया: कृष्णा शिंदे

बीड : येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात सौ.छाया गणेश पांचाळ रा.अंबिलवडगाव यांना प्रसुती दरम्यान वेळेवर औषधोपचार मिळाला नाही. व यामध्ये डॉक्टरांचा हलगर्जीपणा आणि या संदर्भातील मेडिकल अहवाल प्राप्त झाल्यानंतरही येथील शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गुन्हा दाखल करत नसल्याने आज आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे शोले स्टाईल आंदोलन करून गुन्हा नोंद न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी. मयत छाया गणेश पांचाळ यांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली.


beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १४४ ■ सोमवार १३ एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१४ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 144 ■ Monday 13 April 2026 ■RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# गायरान जमिनीच्या वादातून खून;आरोपींना अवघ्या ६ तासांत अटक

बीड (सरकार): गायराण जमिनीच्या बांधावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीचा खून झाल्याची धक्कादायक घटना गेवराई तालुक्यात उघडकीस आली असून, या प्रकरणातील दोन आरोपींना पोलिसांनी अवघ्या सहा तासांत अटक करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पपेश उर्फ गुड्डुया अर्जुन माळी (वय ३१, रा. रामनगर तांडा, ता. गेवराई) यांनी १२ एप्रिल रोजी गेवराई पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. ११ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास त्यांचे वडील अर्जुन साहेबराव माळी हे गोंडगाव शिवारातील गायराण जमिनीची पाहणी करण्यासाठी गेले असता, बांध कोरण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले. या मारहाणीत आरोपी मधुकर नायबा शिंदे, मनोहर मधुकर शिंदे आणि एका विधी



संघर्षग्रस्त बालकाने अर्जुन माळी यांना गंभीर मारहाण केली. जखमी अवस्थेत त्यांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी बीड येथील सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१७/२०२६ अन्वये भा.न्या. संहितेच्या कलम १०३(१), ३५२, ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अण्णासाहेब पवार करीत आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींच्या शोधासाठी विविध पथके छत्रपती संभाजीनगर, जालना व धाराशिव जिल्ह्यांत रवाना करण्यात आली. आरोपींनी मोबाईल बंद करून लपण्याचा प्रयत्न केला होता. मात्र गोपनीय माहितीच्या आधारे ते बीड शहरातील बार्शीनाका परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. यानुसार पोलिस पथकाने तातडीने कारवाई करत आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना शिताफीने ताब्यात घेतले व गेवराई पोलीस ठाण्यात आणून अटक केली. ही संपूर्ण कारवाई अवघ्या सहा तासांत पूर्ण करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवीनत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वात पार पडली. तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

## पेठ बीड मध्ये गुटख्याच्या साठ्यावर छापा

### ६४,८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त,डिबी पथकाची कारवाई

बीड (सरकार): राज्य सरकारने गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थावर बंदी असताना देखील बीड जिल्ह्यात मात्र खुलेआम गुटखा विक्री होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे याकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.

दिनांक १२ एप्रिल रविवार रोजी पेठ बीड पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने प्रतिबंधित गुटख्याच्या साठ्यावर छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण ६४,८४० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे बाबा चौक, इस्लामपुरा येथे छापा टाकण्यात आला. यावेळी प्रतिबंधित गुटख्याचा साठा आढळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी अफरोज तांबोली हा फरार असून त्याच्या विरोधात पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००/२०२६



नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा हे करत आहेत.तसेच बार्शी नाका, मोमीनपुरा भागात देखील गुटखा माफियावर कारवाई करण्यात यावी

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पेठ बीड पोलीस निरीक्षक मारोती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मन्सूर शहा, पोलीस हवालदार माने तसेच पोलीस अंमलदार गिरी व राख यांच्या पथकाने केली.

## बीडसह राज्यातील १७७ तालुक्यांमध्ये संतुलित सर्वांगिण व गतिमान विकास योजना राबविणार

### राज्यमंत्री मंत्रीमंडळ बैठकीत धडाकेबाज आठ निर्णय

मुंबई (सरकार): राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. त्यामध्ये, आशाताईंच्या नावाने संगीत अकॅडमीसह पदभरती प्रक्रियेत सुधारणा, मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठाच्या स्थापनेसह आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

ज्येष्ठ पार्श्वगायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्यावतीने मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करणार आहे. राज्य सरकारकडे वांद्रे-अंधेरी दरम्यान हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची आशा भोसले यांनी मागणी केली होती. आता, आशा भोसले यांच्या नावाने स्मारक करायच का? असं मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मुद्दा उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी बोलताना आशाताईंनी दिलेला प्रस्तावच आपण पुढे नेऊ असे सांगितलं. त्यामुळे, आता वांद्रे-अंधेरी दरम्यान आशाताईंच्या नावाने संगीत अकॅडमी' उभारण्यात येणार असल्याचे निश्चित झालं आहे. यासंदर्भात जागा शोधण्यासाठी म्हाडाला आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे, मृत्यूनंतर राज्य सरकारने आशाताईंची मागणी मंजूर केल्याचं दिसून येतं.

शासन सेवेतील पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करणार. विकसित महाराष्ट्र २०४७ चया व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून कृती आराखडा. एमपीएससीच्या माध्यमातून घेणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या ५३ वरून १५३. संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने काही सेवांचा समावेश होणार. भरती प्रक्रीया सुलभ होणार. युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबविणार.

नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या आणखी सहा जिल्हयांचा समावेश. त्यामुळे सध्याच्या २७ आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये संतुलित, सर्वांगिण व गतिमान विकासाच्या योजना राबविणार. (नियोजन विभाग) वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करणार. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार प्रशासन व संस्थात्मक रचनेत बदल होणार. परिषदेमधील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीच्या ऐवजी शासनाकडून नामननिर्देशन पद्धतीने होणार (वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

## बीडच्या वस्तीगृहातून निघून गेलेल्या दोन मुली पोलिसांच्या ताब्यात


बीड (सरकार)येथील एका वस्तीगृहातून कोणालाही न सांगता निघून गेलेल्या मुलींना पुण्याला पोहोचायच्या आतच पोलिसांनी ताब्यात घेतले. रविवारी सकाळी या मुली वस्तीगृहातून बाहेर पडल्या होत्या.

बीड शहरातील एका वस्तीगृहात राहत असलेल्या दोन अल्पवयीन मुली रविवारी सकाळीच कोणालाही न सांगता निघून गेल्या होत्या. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास येतात त्यांनी तात्काळ वस्तीगृह गाठत तेथील अधिकाऱ्यांना जाब विचारला तसेच या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला. यानंतर तातडीने कारवाई करत शिवाजीनगर पोलिसांनी इतर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांची मदत घेत या मुलींना पुण्याला पोहोचण्याच्या आधीच ताब्यात घेतले. दरम्यान आता या मुली कोणालाही न सांगता पुण्याला का जात होत्या, त्यांच्यासोबत आणखी कोणी होते का या सर्व प्रश्नांची उत्तरे मुली बीडमध्ये पोहोचल्यानंतरच मिळू शकणार आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय माधव काटकर, पीएसआय संकेत घुगे, अनिता खरमाटे वैशाली राख यांच्या टीमने केली.

## शरीरसंबंधाला केले प्रवृत्त; भावाला पासवर्ड पाठवून डॉ.दाभाडेंनी दिला जीव

बीड (सरकार)२९ वर्षीय डॉक्टर मंदार उमेश दाभाडे यांच्या मृत्यू प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या डॉ. दाभाडेंनी चनई रोड भागातील संत रोहिदास नगर येथे भाड्याने वास्तव्यास असलेल्या घरात गळफास घेतल्याची घटना ६ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास समोर आली होती. महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी आयुष्याची अखेर केल्याची माहिती समोर आली आहे.

डॉ मंदार दाभाडे आपल्या घराचे दार उघडत नसल्याने शेजाऱ्यांना संशय आला होता. त्यामुळे पोलिसांच्या मदतीने दार उघडण्यात आल्यावर सर्वांना मोठा धक्का बसला. या प्रकरणाचा उलगडा अतिशय फिल्मी पद्धतीने झाला. कारण मृत्यूपूर्वी डॉक्टर दाभाडे यांनी आपल्या भावाच्या मोबाईलवर पाठवलेल्या एका पासवर्डमुळे या प्रकरणातील धक्कादायक वास्तव उघड झालं. एका महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी जीव दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी भावाने दिलेल्या तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात संबंधित महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. मंदार यांनी



जीव देण्यापूर्वी भाऊ लौकिक दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड पाठवला असल्याचा खुलासा करण्यात आला होता.

मयत डॉ मंदार दाभाडे यांचे अंत्यविधी आटोपल्यानंतर लौकिक यांनी तो पासवर्ड वापरुन मंदार यांचा मोबाईल उघडला असता, त्यामध्ये एक धक्कादायक सुसाईड नोट आढळून आली. त्यात मंदार यांनी 'सॉरी पप्पा व भैया' असे म्हणत आपल्या वडिलांची आणि भावाची माफी मागितली. स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. डॉ मंदार दाभाडे यांचे एका सहकाऱ्याच्या घटस्फोटित बहिणीसोबत (मूळ रा. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. रोहिदास नगर, चनई रोड, अंबाजोगाई) ओळख होती. तिने मंदार यांना स्वतःचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि चॅट्स पाठवून शरीरसंबंधांसाठी प्रवृत्त केले होते. त्यानंतर तिने 'मी गर्भवती असून माझ्याशी लग्न कर, नाहीतर मी विष पिऊन जीव देईन आणि सुसाईड नोटमध्ये तुझं नाव लिहीन' अशी धमकी देत सातत्याने ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली असल्याचे देखील त्या नोट मध्ये लिहिले असल्याचे सांगण्यात आले आहे. या सततच्या मानसिक त्रासामुळे आणि बदनामीच्या भीतीने डॉक्टर मंदार दाभाडे खचून गेले आणि त्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. उंदीरनाशकाची दहा पाकिटं, आत्या-मावशांची चौकशी; डोसा पीठ केसमध्ये फास आवळला, अटकेची टांगती तलवार या प्रकरणाच्या अनुषंगाने समोर आलेल्या धक्कादायक खुलाशानंतर डॉ मंदार दाभाडे यांचा भाऊ लौकिक दाभाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाजोगाई येथील शहर पोलिस ठाण्यातीन पोलिसांनी आरोपी महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ नुसार जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ससाणे करत असल्याचे सांगण्यात आले आहे.


## केज हादरले! सावत्र बापाचा १३ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

केज (सरकार)केजमध्ये नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अवघ्या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच सावत्र बापाने लैंगिक अत्याचार केला असून, या नराधमावर केज पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या आईने पतीसोबत मतभेद झाल्याने नऊ वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला होता. त्यानंतर तिने आरोपीसोबत दुसरे लग्न केले. या दुसऱ्या लग्नापासून त्यांना एक मुलगाही आहे. ९ एप्रिल रोजी पीडित मुलीची आई माहेरी गेली होती. दुपारी साडेबाराच्या सुमारास सावत्र पिता घरी आला आणि मुलगी घरी एकटीच असल्याचे पाहून त्याने गैरफायदा घेण्याचे ठरवले. त्याने आपल्या साडेतीन वर्षांच्या मुलाला मोबाईल देऊन गुंतवून ठेवले आणि अल्पवयीन मुलीशी लज्जास्पद चाळे करण्यास सुरुवात केली. मुलीने त्याला विरोध करत आईला सांगण्याची धमकी दिली. मात्र, आईला सांगायचे नसते, आपल्यात भांडणे होतील, असे म्हणत त्याने मुलीवर बळजबरीने अत्याचार केला. आई घरी आल्यानंतर मुलगी रडत असल्याचे तिच्या निदर्शनास आले. आईने विचारले असता सुरुवातीला मुलगी प्रचंड घाबरलेली असल्याने काहीच बोलली नाही, मात्र आईने विश्वासात घेऊन विचारल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला.त्यानंतर पीडितेच्या आईने केज पोलिस ठाण्यात धाव घेत नराधम पित्याविरोधात तक्रार दाखल केली. दिलेल्या तक्रारीवरून नराधमावर गु. र. नं. १९८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता ६४(३)(एफ), ६५(१) आणि पोक्सो कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके करत आहेत.

## तरुणीकडून लैंगिक अत्याचाराची तक्रार; बीडच्या आरोपीला पुण्यातून अटक

पालघर (सरकार): सोशल मीडियाचे जसे फायदे आहेत, तसेच अनेकदा त्याचे तोटेही समोर आले आहेत. सोशल मीडियातून गुन्हेगारी देखील वाढल्याचं दिसून आलं, त्यातून पोलिसांच्य सायबर सेलकडे जबाबदारीचे काम सोपविण्यात आले आहेत. सोशल मीडियातून ओळख, नंतर प्रेम, लग्न आणि गंभीर गुन्ह्यासारख्या



घटना यापूर्वी देखील अनेकदा घडल्या आहेत. आता, पालघर जिल्ह्यातही अशीच एक घटना समोर आली आहे. इंस्टाग्रामवरुन मैत्री करून तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार लव्ह जिहाद असल्याचा आरोप केला जात आहे.

## नगर -कल्याण महामार्गावर भीषण अपघात;८ जणांचा मृत्यू



अहिल्यानगर (सरकार) कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर सोमवारी सकाळी एक अत्यंत भीषण आणि काळजाचा थरकाप उडवणारी अपघाताची घटना घडली आहे. एका भरधाव सिमेंट मिक्सरने प्रवाशांनी भरलेल्या काळी-पिवळी इको टॅक्सीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ८ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही इको कार कल्याण ते मुरबाड या मार्गावर प्रवासी वाहतूक करत होती. पाच आसनांच्या या गाडीत १२ प्रवासी कोंबून भरले होते. ही गाडी सुसाट वेगाने मुरबाडच्या दिशेने जात होती. याचवेळी रायते पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सर ट्रकची आणि इको कारची समोरासमोर भीषण धडक झाली.

बीड सरकार

■ सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६



# संपादकीय


## युद्ध विरामालाच विराम?

शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली.

अमेरिका आणि इराण यांच्यात १४ दिवसांकरिता युद्धविराम जाहीर झाला असला, तरी हा विराम क्षणिक ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. कारण त्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सातत्याने बदलणारी भूमिका व युद्ध लढविण्याची इराणची खुमखुमी यामुळे युद्धविराम फार काळ टिकणार नसल्याचे संकेत होते. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाला अवघा एक दिवस लोटत नाही, तोच या युद्धविरामाचे भवितव्य संकटात सापडले. दोन्ही देशांमध्ये पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे नियोजित असलेल्या शांतता चर्चेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली. इराणचे पाकिस्तानमधील राजदूत अमिरी मोगदम यांनी इराणचं शिष्टमंडळ शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये येणार असल्याची माहिती एक्सवरील पोस्टमधून दिली होती. मात्र काही वेळातच त्यांनी ही पोस्ट हटवली. त्यामुळे पुन्हा युद्ध भडकण्याचे संकेत निर्माण झालेत. अमेरिका आणि इराणमध्ये सध्या दोन आठवड्यांचा युद्धविराम सुरू असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा इराणला निर्वाणीचा इशारा दिला. दोन्ही देशांमध्ये अंतिम आणि ठोस करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकेचे लष्करी बळ इराणच्या सीमांनजीक तैनात राहील. तोपर्यंत आमचे सैन्य माघारी फिरणार नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. हा करार यशस्वी झाला नाही, तर इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल, अशी धमकीही त्यांनी दिली. त्यामुळे युद्धबंदीची घोषणा पुन्हा एकदा नामधारी ठरण्याची शक्यता असून विनाशकारी युद्ध अंतिम क्षणापर्यंत लढले जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले. अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण हा संघर्ष २८ फेब्रुवारीपासून सुरू आहे. बुधवारी १४ दिवसांकरता अमेरिका-इराण या दोन देशांमध्ये शस्त्रसंधी झाली. या शस्त्रसंधीला अमेरिकेचा युद्धातील मित्र इस्त्रायलने देखील संमती दिली. पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन आठवड्यांची शस्त्रसंधी झाल्याचे सांगण्यात आले. या शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली आहे. या राष्ट्रांमध्ये भारताचा अपवाद वगळता अन्य राष्ट्रांमध्ये महागाईचा आगडोंब उसळला आहे. ही युद्धबंदी प्रत्यक्षात येणार की केवळ कागदोपत्रीच घोषणा राहणार, यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी होताच स्वत:ची पाठ थोपटून घेणारा पाकिस्तान आता तोंडावर पडला आहे. युद्धबंदीच्या घोषणेनंतर अवघ्या काही तासांमध्ये इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ले केले. मग इराणने यूएई, कुवेतला लक्ष्य केले. शस्त्रसंधीची घोषणा झाल्यावर २४ तासांच्या आत पुन्हा युद्धविषयक घडामोडी सुरूच राहिल्या. हल्ले होतच राहिले. यामुळे पाकिस्तानने घडवून आणलेल्या व छातीचा ढोल करत जगभर दवंडी पिटवलेल्या शस्त्रसंधीचे नेमके काय झाले, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. पण लेबनॉन या शस्त्रसंधीचा भाग होता की नाही, यावरून सगळा घोळ झाला. मध्यस्थीचा दावा पाकिस्तानने केल्याने आता त्यांची गोची झाली. इस्त्रायलने त्यांचा शेजारी देश असलेल्या लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले. त्यामुळे पाकिस्तान तोंडावर आपटला. शस्त्रसंधी सगळ्या ठिकाणी लागू आहे, त्यात लेबनॉनचाही समावेश असल्याचे पाकिस्तानचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीरपणे म्हटले होते. १० एप्रिलला इस्लामाबादमध्ये होत असलेल्या बैठकीत या सगळ्या मुद्द्यांवर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वासही शरीफ यांनी व्यक्त केला. त्यांनी केलेला दावा आणि युद्धबंदीनंतरही सुरू असलेले हल्ले यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संभ्रम निर्माण झाला. कारण शस्त्रसंधीसंदर्भात इस्त्रायल आणि अमेरिकेकडून करण्यात आलेली विधाने परस्परविरोधी आहेत. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वान्स यांनी शरीफ यांचा दावा स्पष्ट शब्दांत खोडून काढला. 'काहीतरी गैरसमजातून हा प्रकार घडला. लेबनॉनचा समावेश शस्त्रसंधीत असल्याचं इराणला वाटलं असेल. पण आम्ही कधीही तसे आश्वासन दिलेलं नाही. तसे संकेत देखील आम्ही कधी दिले नव्हते,' असे अमेरिकेने स्पष्ट केल्याने पाकिस्तानच्या मध्यस्थीवर प्रश्न उपस्थित झाले. अमेरिकेनं केलेला दावा खोटा असल्याचं पाकिस्तानचं म्हणणं आहे. इराणसोबत झालेल्या शस्त्रसंधीत लेबनॉनच्या मुद्द्याचा समावेश होता, असा दावा अमेरिकेतील पाकिस्तानचे राजदूत रिजवान सईद शेख यांनी केला. लेबनॉनचा विषय शस्त्रसंधीत नव्हताच, असा इस्त्रायलचाही दावा आहे. अमेरिका, इस्त्रायलनं घेतलेल्या भूमिकेमुळे मध्यस्थीसाठी स्वत:ची पाठ थोपटून घेणाऱ्या पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय पातळीवर फजिती झाली. युद्ध सुरू झाल्यावर भारतासारख्या अनेक देशांमध्ये इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले. अनेक उद्योगांवर परिणाम झाला. महाराष्ट्रामध्ये रोजगार-व्यवसायासाठी आलेले परराज्यातील मजूर, कर्मचारी आपल्या राज्यात निघून गेल्याने छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला. किरकोळ खाद्यपदार्थांच्या गाड्या रस्त्यावरून गायब झाल्या. अनेक हॉटेल्समधील गॅसच्या टाक्या अदृश्य झाल्या. कोळशावर शेगड्या पेटविण्यात आल्या. इंधनाचे दर वाढल्यावर महागाईला पोषक वातावरण निर्माण होते. इंधनाचे दर उतरले तरी महागाई कमी होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. जगातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तून जाणाऱ्या प्रत्येक तेलवाहू जहाजाकडून आता इराण प्रति बॅरल १ डॉलर इतका 'टोल' वसूल करणार आहे. विशेष म्हणजे, हा कर क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून भरावा लागणार. त्यामुळे भारताला महागड्या दराने तेल खरेदी करावं लागणार.

# होमिओपॅथीक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन

**होमिओपॅथीक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या २७१ व्या जयंती निमित्त आज दि.१० एप्रिल २०२६ रोजी येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, बीडचे माजी प्राचार्य / संचालक व केंद्रीय होमिओपॅथीक परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अरूण भस्मे यांनी अनेक ग्रंथांच्या आधारे अनुवादीत केलेला डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा लेख या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे.**



भौतिक विकासाने गुंग झालेल्या आजच्या जगातील जनतेला सत्याची मांडणी करताना देखील विचारांची दिशा भौतिक आधारावरच बसविण्याची इच्छा होते. वास्तविक पाहता सत्य शोधण्याची अथवा सिध्द करण्याची आवश्यकता पडू नये कारण, सत्य हे सत्यच आहे परंतू असत्याचा प्रभाव आजपर्यंत सत्यासंबंधी विश्वास असताना कोणीही नाहीसा करू शकला नाही.

अणूच्या विभाजनाने उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा महाभयंकर प्रताप आजच्या अणूयुगात विकासाला व नाशाला किती प्रमाणात प्रभावी ठरू शकतो याचा अनुभव डोळयासमोर दिसल्याने प्रत्येक व्यकती या सिध्दांताच्या संशोधकाला जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या मालिकेत नेऊन बसविते त्याच प्रमाणे प्रत्येक पदार्थातील अणूचे विभाजन विभाजनाच्या कालमयदिपर्यंत नेहने सत्य आहे व ते विभाजन रोगी, दुःखी, जनतेला सदृढ आरोग्य देण्याचे समर्थ समाधान आहे. सिध्दांताच्या प्रयोगाने व सिध्दीकरणाने सिध्दांत मांडणारा डॉ. सॅम्युअल हॅनिमन जनतेच्या दरबारात उच्च सिंहासनावर जाऊन बसला आहे. महापुरूष कोणत्याही शाळेत किंवा कारखान्यात तयार होत नसतात ते परमेश्वरी प्रेरणेने उत्पन्न होत असतात व त्यांची उत्पत्ती ही जगाच्या कल्याणाकरीताच असल्याने त्यांच्या मार्गात येणारी सर्व संकटे नाहीशी होवून सत्याचा परिचय जगाला देत असतात असा आरोगय शास्त्रात क्रांती करणारा जनतेच्या सदृढ आरोग्याचे साधन व तत्व सांगणारा महापुरूष १० एप्रिल १७५५ साली जर्मनीतील सॅक्सोनी प्रांतात मिसेन खेड्यात मातीच्या भांडयांना रंग देणाऱ्या गरीब बापाच्या पोटी जन्माला आला. महापुरूषाची उत्पत्ती त्यांनी केलेल्या तेजस्वी कार्याची शहानिशा करतात.

डॉ. सॅम्यूअल हॅनिमन यांचे मनाने ज्ञान, लालसेची प्रचंड इच्छा असल्याने मिळेल तया वेळेचा व संधीचा योग्य उपयोग करून त्यांनी आपले ज्ञानार्जन कार्य चालू ठेवले, तीव्र इच्छाशक्ती व महान परिश्रम करण्याची तयारी असताना परमेश्वरी प्रेरणा ही साहाय्यभूत झाली. परिणामतः वयाच्या १२ व्या वर्षी ते आपल्या अनुयायांना ग्रीक भाषा समजावून देवू लागले. वयाच्या २० व्या वर्षी ३ परदेशी भाषांत व अनेक विषयात त्यांनी प्राविण्य मिळविले. आपल्या मुलाची ज्ञानार्जनाची तीव्र इच्छा पाहशिकविणे सुरू केले. रात्री भाषांतर करणे व फूरसतीच्या वेळी इतरांना शिकवीणे हा त्यांचा नित्यक्रम होवून बसला. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांचे अकरा भाषांवर प्रभूत्व होते. १० ऑगस्ट १७७९ साली त्यांनी एरजेल विद्यापीठाची एम.डी.ची डिग्री मिळविली. दिन प्रतीदिनी येणाऱ्या अनुभवांमुळे त्यांना असे वाटते की ते करीत असलेल्या रोगासंबंधीचा विचार हा परिपूर्ण नसून पुस्तकी ज्ञानावर व पर्यायाने रोगासंबंधीच्या अज्ञानावर आधारीत आहे. त्यावर कराव्या लागणाऱ्या औषधाचे कार्य हे सुध्दा अज्ञानावर आधारीत आहे. या तीव्र औषधाचा वापर आरोग्य देण्याऐवजी मृत्यूलाच आवाहन करीत आहे.

अशा प्रकारे ॲलोपॅथी करणारे प्रामाणिक चिकित्सक या नात्याने जनतेची दुःखे वाढविणारा व पर्यायाने एक खूनी म्हणून त्यांच्या हृदयात एक कंप सुरु झाला व त्यामुळे त्यांनी चिकित्सा करणे सोडून रसायनशास्त्व व साहित्य विषयातच आपले लक्ष घातले. भावना व सत्य यांची जोड असणारी व्यक्ती ही सदैव गुणी प्रकृती असते. त्या काळी चिकित्सेच्या पध्दती या भयानक व अपरिपक्व होत्या, राजाश्रयामुळे

त्यांना राजमान्यता मिळालेली होती. सामाजिक मान्यता व बुध्दीमत्त या दोन्ही गुणांमुळे डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांनी आपल्या मनाचे व प्रामाणिकतेचे विरूध्द अगणित संपत्ती त्यांना मिळविणे शक्य झाले असते. परंतू मनाच्या प्रमाणिकतेचा प्रभाव त्यांना अधोगतीकडे नेत असतांनाही ते आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत. विल्यम क्यूलेन यांच्या मटेरिया मेडिका या पुस्तकातील सिंकोनाबार्क ह्या चाप्टरमध्ये ह्या औषधाच्या रसाने निरोगी मनुष्यात मलेरियाच्या तापाची लक्षणे उत्पन्न होतात व त्याचाच सुत्र भाग घेतल्याने ती लक्षणे नाहीशी होतात हे त्यांनी वाचले तेवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी स्वतःवर सिंकोना सालीचा रस काढून तो रस स्वतः घेतल्या नंतर काही वेळात त्यांच्यावर मलेरियाची लक्षणे उत्पन्न झाली व ते औषध पुन्हा घेतल्याने ती लक्षणे नाहीशी झाली या संबंधीचा विचार त्यांना अस्वस्थ करावयास लागला. ही घटना लिपझिक येथे १७९० साली घडली अत्यंत सुक्ष्मपणे निरीक्षण व प्रयोग करून व काही प्रयोग स्वतःवर, स्वतःच्या कुटूंबियांवर, मित्रांवर करून संपूर्ण सिंकोनाबार्क प्रमाणेच सर्व औषधांच्या कार्याचे परिमिश्रण त्यांना समान दिसले.

१७८२ साली डेस्सू येथे जेव्हाना कुचलर यांच्याशी त्यांचा विवाह झाला नंतर त्यांनी चिकित्सा करण्यास सुरूवात केली. ध्येयासंबंधी जिद्द व वाढत्या जबाबदाऱ्या यामुळे दिन प्रतिदीन दारिद्र्यात वृध्दी होत होती. १९७१ साली त्यांना खेड्यात जावे लागले अशा परिस्थितीत त्यांची मुले आजारी पडली या सर्व प्रकारच्या भयान आपत्तींना तोंड देत असता आपल्या ध्येयावर अधिष्ठित राहून रोगमुक्तीचा सिध्दांत त्यावेळी शोधून काढला. प्रत्येक प्रयोगाचा निष्कर्ष एकच होता की, भौतिक अवस्थेतील प्रत्येक औषध सुदृढ व्यक्तीच्या प्रकृतीवर आजार उत्पन्न करते आणि त्याच औषधाचा सुक्ष्म भाग

त्या रोग्याचा रोग नाहीसा करतो. अशा प्रकारे आरोग्य जगतात चिकित्सेचा नवीन सिध्दांत समः सम् शमयति जन्म पावला. आपत्ती एकट्या येत नसतात चिकित्सकांचा मत्सर, चुकीच्या औषधाचा वापर, सभोवार पसरलेल्या अज्ञानी लोकांचा समुह, स्वतःच्या मनातील शुध्द व प्रेमळ भावना, तथाकथित चिकित्सकांची मत्सरे व उपमर्दकारक वागणूक, कायद्याचा त्रास या सर्व गोष्टींना त्रासून या महान व्यक्तीला देशही सोडावा लागून दारोदार भटकावे लागले. सन १७९७ साली आपले सारे कुटूंब व थोडेसे घरगुती सामान घेवून एका खटाऱ्यातून हॅम्बुर्ग कडे रवाना झाले. दुर्देवासकट सर्व संकटे त्यांच्या पाचवीला पुजलेली होती. एका चढाईवर चढून जात असतांना तो खराटा उचलला त्यांचा लहान मुलगा जखमी होवून तात्काळ मरण पावला एका मुलीचा पाय तुटला डॉ. सॅम्यूअल हॅनीमन स्वतः ही जखमी झाले. सर्व घरगुती सामान खाली असलेल्या ओढ्यात वाह दारिद्र्य ही प्रत्येक कलेची जन्मदाती आई आहे हीच गोष्ट डॉ. सॅम्यूअल हॅनिमन यांचे बाबतीत प्रकर्षान अनुभवास आली जीवनाचे प्रत्येक कार्य हे महान काव्य म्हणून घेण्याकरिता दारिद्र्य व परिश्रम या द्वारेच प्रगट होते. त्यानंतर त्यांनी ऑरगॅनन ऑफ मेडिसीन हे पुस्तक लिहून प्रकाशित केले. केले त्या पुस्तकात होमिओपॅथीची तत्वे सांगितलेली आहेत ही तत्वे कधीही न बदलणारी आहेत व ती निसर्गावरच अवलंबून आहेत. सुख आणि दुःख बरोबरच राहतात ज्या माऊलीने म्हणजे त्यांच्या पत्नीने जन्मभर दुःखाचा महान वाटा उचलला, ११ मुले व त्यांनी डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांची अविरत सेवा केली ती माऊली ३१ मार्च १८३० या वर्षी परलोकवासी झाली. डॉ. सॅम्युअल हॅनिमन यसंबंधी म्हणतात प्रत्येक व्यक्ती मायेत व संसारात इतकी मग्न होवून जाते की परमेश्वरापासून मिळत असलेल्या प्रेमाचा व आशिर्वादाचा सतत प्रवाह आपल्या जीवनात सर्व बऱ्या वाईट गोष्टी करण्याकरिता एकमात्र कारण आहे व तोच कर्ता करविता आहे याची जाणीव विसरून जाते. त्याच्या अखंडपणे मिळत असलेल्या कृपेला कृतघ्न होते.

चिकित्सा शास्त्रात सत्चिकित्सेद्वारे मानवतेची अहर्निष सेवा करणाऱ्या महान चिकित्सकाच्या जीवनात वयाच्या ८० व्या वर्षी एक घटना घडली. २८ जानेवारी १८३५ रोजी मेलानी डी हरबिली या ३५ वर्ष वयाच्या फ्रेंच विदेशिने त्यांच्याशी लग्न केले. या महान तत्ववेत्याच्या जीवनातील अपूर्ण राहिलेल्या कार्यात परमेश्वरी योजनेनेच साथ द्यावयाचे ठरवून डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या पाठीशी शारिरीक बळ, तेजस्वी बुध्दीमत्ता व आर्थिक विपूलता श्रीमती मेलानी डी हरबिली यांच्या विवाहाने उत्पन्न करून परमेश्वराने आपले अपूर्ण राहिलेले कार्य डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या कडून पूर्ण करून घेतले. पॅरीस येथे अत्यंत सुखात असतांना डॉ. सॅम्युअल हॅनिमन २ जुलै १८४३ रोजी इहलोकाची यात्रा संपविली व मृत्यू समयी त्यांनी म्हटले, मी व्यर्थ जगलो नाही. चिकित्सा शास्त्राच्या इतिहासात डॉ. सॅम्युअल ॲनिमन यांच्याशी तुलना करणारी चिकाटी, व सातत्य यांची तीव्रता, शास्त्रीय तत्वज्ञान या संबंधी उच्चतम दृष्टीकोन असलेला तत्ववेत्ता आजपर्यंत झाला नाही. स्वतःच्या अक्षरात ५०० पानाचे असे २५ पुस्तके लिहीली, १०० औषधने सिद्दीकरण केले. साधे व त्यांचे ओजस्वी जीवन हे भावी पिढीला पथदर्शक ठरणारे आहे प्रत्येक गरीब, दुःखी व कष्टी रोगी होमिओपॅथीचा तात्कालीन गुण देणाऱ्या व कायम रोगमुक्त करणाऱ्या स्वस्त औषधामुळे डॉ. सॅम्युअल हॅनिमन पवित्र आत्म्याला चिरंतन शांती देण्याची प्रार्थना करीत आहे.

## अननसाचे ज्युस फायदे

पायनापलमध्ये में व्हिटॅमिन - आणि उ भरपूर प्रमाणात असतं. जाणून घ्या त्याचे १० फायदे- यात फायबर, पोटॅशियम, फॉस्फरस आणि कॅल्शियम आढळतात. हे सर्व घटक शरीर निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक आहेत. अननसमध्ये अँटीऑक्सिडंट्स जास्त प्रमाणात असतात, जे शरीर स्वच्छ ठेवत पेशींचा क्षय रोखतात.

हे अँटिऑक्सिडंट संधिवात, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि अनेक प्रकारचे कर्करोग यासारख्या गंभीर आजारांपासून संरक्षण करतात. एक कप अननसाचा रस तुम्हाला ७३% मॅग्नेशियम देतो, ज्यामुळे हाडे आणि ऊती मजबूत होतात. हिरड्या आणि दात निरोगी ठेवण्यासाठी अननस खूप प्रभावी आहे. गाउटमध्येही हे फायदेशीर आहे. अननसात व्हिटॅमिन ए आणि सी असते जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. डोळ्यांचे आरोग्यही चांगलं राहतं. त्यात भरपूर पोटॅशियम असते तर सोडियमचे प्रमाण कमी असते. त्यामुळे शरीरातील रक्तप्रवाहाचा वेग नियंत्रित होतो. याचा आहारात समावेश केल्याने पोटातील जंतांपासून मुक्ती मिळते. अननस नखे निरोगी आणि सुंदर बनवतं. यामुळे त्वचा सुरकुत्या मुक्त होऊन सुंदर होते. एक कप अननसात ८२ कॅलरीज, ० ग्रॅम फॅट, ० ग्रॅम कोलेस्ट्रॉल, २ मिलीग्राम सोडियम, २२ ग्रॅम कार्बोहायड्रेट आणि १ ग्रॅम प्रथिने असतात. हे जीवनसत्त्वांचे योग्य संयोजन आहे.

## त्वचेची काळजी कशी घ्याल?



**मॉईश्चरायझर आणि सीरमचा वापर करा-** विटामिन सी आणि विटामिन ए चा समावेश असलेली सीरम आणि सोबत मॉईश्चरायझरचा वापर करा. विटामिन सी युक्त सीरम त्वचेचे प्रदूषणापासून संरक्षण करतात, तर विटामिन ए हे त्वचेला चिरतरुण करण्यास उपयोगी पडतात, तर मॉईश्चरायझर त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यात मदत करतात.

चेह-यासाठी इसेन्शिअल ऑईलचा वापर करा - त्वचा हायड्रेट करण्यासाठी हे इसेन्शिअल ऑईल नेहमीच मदत करतात. लव्हेंडर ऑईल, खोबरेल तेल, प्राईमरोज ऑईल सारख्या इसेन्शिअल ऑईलचा वापर करा. ज्यांना चेहऱ्यावर पुरळ आहेत, अशा व्यक्तींनी तज्ज्ञांच्या सल्ल्याने फेशिअल ऑईलचा वापर करणे फायदेशीर ठरेल.

स्क्रबचा वापर करा - मृत त्वचा काढून टाकण्यासाठी स्क्रबरचा वापर करा. आठवडय़ातून दोनदा चेहरा स्क्रब केला तरी चालेल, फक्त त्वचा जास्त कोरडी होणार नाही आणि तिचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

गरम पाण्याचा वापर करणे टाळा - गरम पाण्यामुळे त्वचा आणखी कोरडी पडण्याची शक्यता असते. त्यामुळे त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी कोमट अथवा थंड पाण्याचा वापर करावा. त्वचेला लगेचच मॉईश्चरायझ करा, जेणेकरून त्वचेतील ओलावा निघून ती कोरडी पडणार नाही.

**त्वचेची हानी टाळा -** त्वचेला कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही, अशा तापमानामध्ये वावरा. सामान्य तापमानाकरिता वापरल्या जाणा-या कृत्रिम उपकरणांचा वापर शक्यतो कमीच करावा. त्वचेचे नुकसान होऊ नये याकरिता गरम कपडे, हातमोजे, स्कार्फ, शाल यांचा वापर करावा.

**शरीरातील पाण्याच्या पातळीचा समतोल राखा-** हिवाळ्यामध्ये शरीरातील पाण्याची पातळी ढासळणार नाही, याची काळजी घ्या. शीतपेय, चहा, कॉफी यांच्या सेवनाने पाण्याची तहान भागवू नका. थोडय़ा थोडय़ा वेळाने पाण्याचे सवन करत राहावे.

रात्रीच्या वेळी मॉईश्चरायझरचा वापर करा - फक्त चेह-याचे संरक्षण न करता, हाता-पायांची देखील तितकीच काळजी घ्या. रात्री झोपण्यापूर्वी त्वचा मॉईश्चरायझ करा. तसेच स्वच्छ धुतलेल्या आणि थंडीपासून बचाव करणा-या कपडय़ांचा वापर करा. डाएटवर लक्ष ठेवा - एका चांगल्या त्वचेसाठी बाह्य उत्पादनांबरोबर योग्य संतुलित आहाराची देखील आवश्यकता असते. आहारामध्ये ओमेगा ३ युक्त पदार्थांचा समावेश करावा, जसे अंडी, सुकामेवा, अळशी, मासे, दही, चीज, दूध इत्यादी. व्हिटामिन ए, सी व ई युक्त फळांचा आहारात समावेश असणे गरजेचे आहे.

**सनस्क्रीन नक्की वापरा -** हे खूप महत्त्वाचे आहे. बाहेर कितीही धुके असले तरी सनस्क्रीन लावल्याशिवाय बाहेर पडू नका. सूर्यावरील अतिनील किरणं खिडक्या आणि ढगांमधून सहजपणे जाऊ शकतात आणि म्हणूनच हिवाळ्यामध्येही आपण सूर्यापासून सुरक्षित राहणे आवश्यक आहे. टायटॅनियम डायऑक्साइड आणि झिंक ऑक्साईड यांचा समावेश असलेले सनस्क्रीन निवडा. हिवाळ्यामध्ये त्वचेची चांगल्या प्रकारे काळजी घ्या आणि त्वचेला नुकसान होण्यापासून वाचवा. थंडीतही त्वचेची चमक कायम राखण्यासाठी वरील उपाय नक्कीच फायदेशीर ठरतील.

## जाणून घ्या तुमच्या बाळाचा आहार!

अनेक नवमातांना बाळाच्या आहाराच्या गरजांविषयी फार माहिती नसते. आधुनिकीकरण, छोटे कुटुंब, घरी मदत उपलब्ध नसणे आणि इंटरनेटमधून मिळणारी अपूर्ण माहिती यामुळे त्यांच्या तणावाच्या पातळीत भरच पडते. अशा अनेक माता मग फॉर्म्युला दुधाचा आधार घेतात आणि बाटलीने त्यांच्या बाळांना पाजतात. हे अजिबात योग्य नाही, कारण आईचे दूध हेच बाळासाठी सर्वोत्तम असते आणि बाटलीने दूध पाजल्याने दीर्घकालीन परिणाम होतात. बाळाचा जन्म झाल्यानंतर तासाभरात मातांनी स्तनपान सुरू करणे हितकारक असते. बाळासाठी स्तनपान हे पूर्णान्न असते आणि पहिले सहा महिने बाळाला पाण्याचीही आवश्यकता भासत नाही. संशोधनानुसार, ज्या बाळांनी पहिले सहा महिने केवळ स्तनपान केले आहे, त्यांना न्यूमोनिया, ॲलर्जी, पोटाला आतडय़ाला आणि श्वसनमार्गाला संसर्ग होण्याची शक्यता कमी असते आणि ते अधिक बुद्धिमान असतात. तरी बाळ ६ महिन्यांचे झाल्यावर बाळाला दैनंदिन आहाराची गरज भागविण्यासाठी इतर पदार्थांचीही आवश्यकता भासते. ६ महिन्यांनंतर स्तनपानासह बाळाला पूरक अन्न, जसे - वरण-भात, खिचडी, भाज्या घालून केलेली खिचडी, भरड किंवा आंबील आणि फेळे कुस्करून द्यावीत. हे पूरक पदार्थ घरी तयार केलेले, ताजे, पूर्ण शिजलेले असावेत आणि प्युरीच्या प्रकारात द्यावेत.

सुरुवातीला पातळ पदार्थ द्यावेत, त्यानंतर त्याची घनता वाढवत नेऊन सेमीसॉलिड (अर्धघन) आणि घन पदार्थ (सॉलिड) खाऊ घालावेत. सुरुवातील जेवण दिवसातून दोन वेळा द्यावे, त्यानंतर जसजसे वय वाढत जाईल, तसतसे दिवसातून ३ ते ४ वेळा जेवण द्यावे. २ वर्षे पूर्ण होईपर्यंत स्तनपान सुरू ठेवावे. अंडय़ाचा पांढरा भाग आणि गाईचे दूध हे बहुधा ९ ते १२ महिन्यांदरम्यान सुरू करावे. ते लवकर केले असता, बाळाला ॲलर्जी होण्याची शक्यता असते. खूप द्रव पदार्थ म्हणजे डाळीचे पाणी, भाताची पेज, फळांचे रस देणे टाळावे. कारण, त्यामुळे बाळाला पुरेसे तंतू मिळत नाहीत. चणे/सुका मेवा हेसुद्धा पावडरच्या रूपात अथवा शिजवून द्यावेत. नवजात



बालकाच्या आहारात साखर, मीठ आणि मसाले अत्यंत कमी प्रमाणात घालावेत.

भारतात बाळांना बिस्कीट आणि दूध भरविण्याची परंपरा आहे, जी बाळाच्या आरोग्यासाठी अजिबात चांगली नाही. पोषणाच्या दृष्टीने तो अत्यंत निरुपयोगी असतो. कारण, त्यात क्षार, मायक्रो न्युट्रिअंट्स आणि तंतू समाविष्ट नसतात. त्यामुळे बाळामध्ये लोहाची कमतरता आणि बद्धकोष्ठता येते. भारतात त्याला 'मिल्क-बिस्कीट' सिण्ड्रोम म्हणतात. तो आता सिद्ध झाला आहे आणि जे बाळ हा आहार घेते त्याला रक्तक्षय होण्याचीही शक्यता असते. पहिली दोन-तीन वर्षे मुलांना बिस्किटे देणे टाळावे.

वयानुसार द्यावयाचा आहार

पहिले सहा महिने केवळ स्तनपान

६ ते ७ महिने - लिक्विड आणि सेमी सॉलिड डाळी, भरड, भाज्यांचे सूप (गाळून)

८ ते ९ महिने - भाताची खीर, उकडलेला बटाटा, बीटरूट आणि गाजराचे सूप, हंगामी फळे, रोजचे आंबील, इडली, उपमा १०-१२ महिने - अंडय़ाचा बलक आणि भात, भाज्यांचे सूप, ज्वारीचे आंबील, ओट्स, नाचणी

१२-२४ महिने - विविध पिठांचा पराठा/घावण, थालीपीठ, कढी इत्यादी.

## कारल्याचा रस प्या, आरोग्य आणि सौंदर्य मिळवा



अनेकजण वाढत्या वजनाची काळजी करत असतात. आहारातील बदल, व्यायामाचा अभाव याचे कारण असू शकतात. वजन कमी करण्यासाठी आपण अनेक उपाय करून पाहतो, जेणेकरून वजन नियंत्रित ठेवता येईल. या लेखात आम्ही तुम्हाला अशाच एका ज्यूसबद्दल सांगत आहोत, ज्यामुळे तुमची समस्या कमी होऊ शकते. रोज कारल्याचा रस प्यायल्याने तुमचे वजन कमी होण्यास मदत होते तसेच त्याचे इतरही अनेक फायदे आहेत, ज्याचा तुमच्या आरोग्याला फायदा होतो. जाणून घेऊया काय आहे ते फायदे.. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर दररोज एक ग्लास कारल्याचा रस पिणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. हे शरीरातील साखरेची पातळी कमी करते तसेच तुमचे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते. * कारल्याचा रस रोज प्यायल्याने जुनाट खोकल्यापासून आराम मिळतो. * कारल्याचा रस दमा आणि फुफ्फुसाच्या संसर्गाच्या उपचारांसाठी प्रभावी उपाय ठरु शकतो.* कारल्याचा रस चेहऱ्यावर चमक आणण्याचे काम करतो. * जर तुम्ही याचे नियमित सेवन केले तर कारल्याचा रस शरीरातील रक्त शुद्ध करण्यास मदत करतो. यामुळे त्वचा उजळते तसेच मुरुम, मुरुमांची समस्या दूर होते. कारल्याचे सेवन केल्याने कर्करोगाचा धोका कमी होतो. कारले यकृतातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यासाठी देखील प्रभावी आहे. योग्य प्रमाणात कारल्याचे सेवन करण्याबद्दल डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय त्याचा औषधी रुपात वापर करू नये.

## मिठाच्या अतिसेवनामुळे उद्भवू शकतात समस्या

मीठ हा असाच एक घटक आहे जो आपल्या जेवणाची चव वाढवण्याचे काम करतो. मीठ शरीरासाठी आवश्यक आहे परंतु त्याचे प्रमाण मर्यादित असावे. अनेकांना जेवणात जास्त मीठ खाण्याची सवय असते. पण तुम्हाला माहित आहे का की मिठाचे अतिसेवन केल्याने तुम्हाला आजार तर पडतोच, पण सोबतच तुम्ही आतून कमकुवत देखील होता. जाणून घेऊया जास्त मीठ खाल्ल्याने कोणत्या समस्या उद्भवू शकतात -१ जास्त मीठ खाल्ल्याने स्नायू आकुंचन पावतात, ज्यामुळे जास्त कामाच्या ताणामुळे त्यांना वेदना होतात. २ जास्त मीठ खाल्ल्याने हाडे कमजोर होतात. जास्त प्रमाणात मीठ खाल्ल्याने हाडांमधील कॅल्शियमची झीज होते. सामान्य भाषेत समजले तर मीठ खालल्यामुळे हाड खिळखिळ होतात. ३ मिठाच्या अतिसेवनामुळे शरीराच्या अनेक भागांवर सूज येते, त्याला एडिमा असेही म्हणतात. ४ रक्तदाब वाढण्याची समस्या देखील यामुळे होते. बीपीची समस्या असल्यास मीठ कमी खावे. ५ जास्त मीठ तुम्हाला डीहाइड्रेट करते. सोडियममुळे जास्त घाम येतो आणि लघवी होते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते.

# विशेष वृत्त

## जयभिम महोत्सवात काव्याचा विद्रोह जयंती संयोजन समितीचे यशस्वी नियोजन

**बीड :** शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दि. ५ ते १४ एप्रिल या कालावधीत आयोजित जयभिम महोत्सवात गुरुवारी (दि.९) पार पडलेल्या विद्रोही कवी संमेलनाने अक्षरशः विचारांची क्रांती पेटवली. अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध कवींच्या जाज्वल्य शब्दांनी वातावरण दणाणून गेले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निळूभाऊ सावरगेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय क्षीरसागर (सहाय्यक संचालक, इतर मागास समाज कल्याण, बीड), चंद्रप्रकाश शिंदे, वसंत ओगले यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला वैचारिक अधिष्ठान लाभले. संमेलनात कवींनी आपल्या धारदार लेखणीतून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर थेट प्रहार करत समता, न्याय आणि बंधुतेचा संदेश दिला. प्रत्येक कवितेतून विद्रोहाची ठिणगी आणि परिवर्तनाची ज्वाला प्रकट होत होती. श्रोत्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात कवींच्या विचारांना दाद दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कवी आबासाहेब जगझाप यांनी केले, तर प्रा. विनोद गलांडे, प्रा. पांडुरंग सुतार यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत संमेलनाला सुरेख लय दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सुमेध जोगदंड यांनी आभार मानले. हे विद्रोही कवी संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे योगदान दिले. या संमेलनाने केवळ काव्याचा आस्वादच नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्याची नवी प्रेरणा देत जयभिम महोत्सवाची उंची अधिकच वाढवली होती.

## शांततेचा भंग करणाऱ्या सात जणांची कारागृहात रवानगी

**बीडः** जिल्ह्यामध्ये सार्वजनिक शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बीड पोलिसांनी कार्यवाही केली. अपर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या आदेशानुसार दि. ७ एप्रिल रोजी ७रिमांड वॉरंट जारी करण्यात आले. या प्रकरणातील सात आरोपींची जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली. बीड ग्रामीण ठाण्यात दाखल कलम १४१ बी.एन.एस.एस. अन्वये प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली.पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित प्रकरणातील आरोपींनी यापूर्वी कलम १२६ बी.एन.एस.एस. अंतर्गत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अंतिम बंधपत्र दिले होते मात्र या बंधपत्राचा भंग केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध ही कार्यवाही झाली. या कारवाईमध्ये अंगद निकम, बाळू करपे, सुरेश उगले, अभिषेक करपे, मनोज करपे, रविंद्र करपे आणि प्रदीप करपे (सर्व रा. कुमशी ता. बीड) या सात आरोपींच समावेश आहे. या सर्वांविरुद्ध कलम १४४ (१) (ब) बी.एन.एस.एस. प्रमाण कारवाई करून त्यांची उर्वरित कालावधीसाठी जिल्हा कारागृह बीड येथे रवानगी करण्यात आली आहे. या सर्व आरोपींना १ जुलै २०२६ रोज सकाळी ११ वाजता विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड यांच्या समक्ष हजन करण्यात येणार आहे.

## बीडच्या चार सहाय्यक निरीक्षकांना पदोन्नतीचा 'स्टार'

**बीड :** राज्याच्या गृहविभागाकडून पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. गुरुवारी राज्याच्या पोलीस महासंचालकांनी याबाबतचे अधिकृत आदेश जारी केले आहेत. या पदोन्नती प्रक्रियेत बीड जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या चार सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षकपदी बढती मिळाली आहे. या पदोन्नतीसोबतच त्यांची राज्याच्या विविध विभागांत महत्वपूर्ण पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. गृहविभागाकडे वरिष्ठ स्तरावर पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नतीची फाईल प्रलंबित होती. ९ एप्रिल रोजी या प्रक्रियेवर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले असून, राज्यातील एकूण २०१ सहायक पोलीस निरीक्षकांची पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यातून पदोन्नती मिळालेल्यांमध्ये वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांचा समावेश असून, त्यांची नाशिक ग्रामीण येथे पदस्थापना करण्यात आली आहे. तसेच गोविंद पांडव यांची छत्रपती संभाजीनगर लोहमार्ग (रेल्वे) येथे, जिल्हा विशेष शाखेतील गणेश धोक्रट यांची जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे, तर गेवराई उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे वाचक म्हणून कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांची मुंबई शहर येथे पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नतीवर बदली झाली आहे.

## माझं गाव आरोग्य संपन्न गाव उपक्रमाला सौंदाणा येथे सुरुवात



हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांना उत्तम आरोग्याचे महत्त्व पटवून देत, गाव रोगमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला. अध्यक्षस्थानी सौंदाणा गावच्या सरपंच जनाबाई सूर्यभान गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजू गायके व कहानू गायके उपस्थित होते. आरोग्य सेवक रामदास पवळ आणि आरोग्य सेविका राधा जाधव, आशा स्वयंसेविका पार्वती राजू गायके यांनी उपस्थितांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. रामदास पवळ सर यांनी बदलत्या जीवनशैलीत उद्भवणारे आजार आणि त्यावर घ्यावयाची काळजी यावर भाष्य केले. सरपंच जनाबाई गायकवाड यांनी शासनाच्या 'माझ गाव आरोग्य संपन्न गाव' या महत्वकांक्षी अभियानाची माहिती सर्व गावकऱ्यांना दिली. राधा जाधव यांनी माता-बाल संगोपन आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत महिलांना मोलाचे सल्ले दिले. मोहिमेअंतर्गत गावात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पार्वती राजू गायके यांनी यावेळी दिली.

## साळेगावजवळ डिझेल टँकरचा अपघात

**केज :** सोमवारी रात्रीच्या सुमारास केज कळंब रस्त्यावरील साळेगाव बसस्थानकाजवळ एक डिझेल टैंकर दुभाजकाला धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात रस्त्यावरील विजेचे खांब आणि संरक्षक जाळ्यांचे मोठे नुकसान झाले असून, टैंकर रिकामे असल्याने एक मोठा अनर्थ टळला आहे. दिनांक ६ एप्रिल रोजी रात्री ११:१५ वाजेच्या सुमारास सोलापूरहून तेलगावकडे जाणारा डिझेल टैंकर (क्र. चक २३-ण ४८६३) साळेगाव परिसरातून जात होता. रात्रीच्या अंधारात रस्ते दुभाजकाचा अंदाज न आल्याने चालकाचे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टैंकर थेट दुभाजकावर चढला. ही धडक इतकी जोरात होती की, दुभाजकावरील विजेचे खांब उन्मळून पडले आणि संरक्षक जाळ्या भुईसपाट झाल्या. हा अपघात झाला त्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर निवासी घरे आहेत. अपघातग्रस्त टँकरमध्ये डिझेल नसल्याने (टैंकर रिकामे असल्याने) भीषण आग लागण्याची किंवा स्फोट होण्याची शक्यता टळली. चालकाचे नाव बळीराम देशमुख (रा. कन्नापूर, ता. परळी) असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संदीप मांजरमे, पो.हे.कॉ. नागरगोजे आणि आणि सहाय्यक उपनिरीक्षक शंभू देव दराडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी रस्त्यावरील अपघातग्रस्त वाहन आणि पडलेले विजेचे खांब बाजूला सारून वाहतूक सुरळीत केली. टँकर रिकामे असल्याने मोठा धोका टळला असला, तरी या अपघातामुळे सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

# भारतीय खाद्यसंस्कृती आरोग्यदायी आहे-प्रा.डॉ.उषा माने

### श्री. शिवाजीराव पंडीत महाविद्यालयात आरोग्य जनजागृती कार्यशाळा संपन्न

**गढी (प्रतिनिधी):-** जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढ़ी, आदर्श शिक्षण संस्था चीड संचलित कालिकादेवी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिरूरकासार, नवगण शिक्षण संस्था बीड संचलित केशरबाई सोनाजीराव कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड व नवगण शिक्षण संस्था बीड संचलित बसंत दादा पाटील महाविद्यालय पाटोदा येथील गृहविज्ञान विभाग व आरोग्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य

दिनाच्याऔचित्याने कोर्लब्रेशन अंतर्गत आरोग्य जनजागृती कार्यशाळा आभासी पद्धतीने घेण्यात आली. या कार्यशाळेस उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा, प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. उषा माने डॉ. बाबासाहेब आआंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या गृहशाख अभ्यास मंडळ सदस्य तथा

- गृहशास्त्र विभाग प्रमुख श्री पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा ता. परळी जि बीड तर अध्यक्ष म्हणून श्री शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व बाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यानी असे प्रतिपादन केले की जागतिक आरोग्य दिन ७एप्रिल रोजी साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न एकत्रित करण्याकरिता स्थापित केलेला हा दिवस साजरा करणयासाठी जग एकत्र बेते. म्हणून या दिवसाला अतीव महत्व आहे जागतिक आरोग्य दिन २०२६ ची थीम आरोग्यासाठी एकत्र. विज्ञानासोचत उभे राहा ही थीम खरोखरच विज्ञानावर विश्वास ठेवून सर्वांच्या आरोग्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन करत आहे. या कार्यशाळेच्या प्रमुख मार्गदर्शक डॉ. उषा माने यांनी असे प्रतिपादन केले की प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय आरोग्याचा सर्वोच्च दर्जा प्राप्त करण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. तसेच, सामाजिक-आर्थिक स्थिती, वंश किंवा भौगोलिक स्थानाचा विचार न करता, सर्वांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा, अत्यावश्यक औषधे आणि समान आरोग्य सेवा उपलब्ध असण्याचे महत्त्व अधोरेखित करते. ही संकल्पना आरोग्याच्या हकाचे समर्थन आणि संरक्षण करण्यासाठी सामूहिक कृतीचे आवाहन करते. आपली भारतीय खाद्य संस्कृती खऱ्या अर्थाने आरोग्यदायी आहे. यावेळी त्यांनी आपले दैनंदिन आरोग्य चांगले राखण्यासाठी करावयाच्या उपायोजना याविषयी सविस्तर माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी जागतिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे जगभरातील लक्ष वेधण्याची ही एक संधी मानली जाते. जागतिक आरोग्य संघटना या दिवशी एका विशिष्ट संकल्पनेशी संबंधित आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक कार्यक्रमांचे आयोजन करते. जागतिक आरोग्य दिनाला सार्वजनिक आरोग्य समस्यांमध्ये स्वारस्य असलेल्या विविध सरकारांद्वारे आणि गैर-सरकारी संस्थाद्वारे मान्यता दिली जाते व समाजस्वास्थ्य टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातात, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्र माचे प्रास्ताविक श्री. शिवाजीराव पंडीत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या गृहशास्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. राणी जाधव, पाहुण्याचा परिचय वसंत दादा पाटील महाविद्यालय पाटोदा येथील गृहशाख विभागप्रमुख प्रा. डॉ. मनीषा गाढवे, सूत्रसंचालन श्री शिवाजीराव पंडीत कला, विज्ञान व बाणिज्य महाविद्यालय गडी येथील गृहशास विभागाच्या प्रा डॉ. अयोध्या पवळ, तर आभारप्रदर्शन कालिकादेवी महाविद्यालय शिरूरकासार येथील गृहशाख विभाग प्रमुख प्रा. डॉ. चेतना डॉगलीकर यांनी केले. या कार्यशाळेत के. एस. के. महाविद्यालयाच्या गृहशास विभाग प्रमुख प्रा. डॉ. चंदना फटाले, कालिकादेवी महाविद्यालयाच्या गृहशास विभागाच्या प्रा. अफरोज सय्यद, आरोग्य समितीचे प्रा. डॉ. शिवलाल घुगे व प्रा. डॉ. हिरा पोटकुले बांच्यासह चारही महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आभासी पद्धतीने बहुसंख्येने सहभागी झाले होते.

# शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू : मनोज शिंदे

### केज तालुक्यात एकाच दिवशी शिवसेनेच्या सात शाखा स्थापन

**बीड (प्रतिनिधी):** शिवसेना वाढवण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या भागात सक्रिय राहून जनतेशी संपर्क वाढवावा. कार्यकर्त्यांनी संघटनेशी निष्ठा ठेवून काम करणे गरजेचे आहे. आगामी काळात शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू, असा विश्वास शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांनी व्यक्त केला.

केज तालुक्यातील कासारी, धार्मळा, साबला, लहुरी, येवता, बेंगळवाडी, कोरडेवाडी अशा सात ठिकाणी शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनेत्या संगीता ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. यावेळी मनोज शिंदे म्हणाले, केज तालुक्यातील प्रत्येक गावात, प्रत्येक वाड्या-वस्तीत शिवसेनेचा भगवा पोहोचला पाहिजे हा आमचा निर्धार आहे. नव्याने सुरू झालेल्या या शाखा केवळ नावापुरत्या नसून त्या जनतेच्या प्रश्नांवर लढा देणाऱ्या केंद्रबिंदू ठरतील. आगामी काळात बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, पाणीटंचाई यांसारख्या मुद्द्यांवर शिवसेना आक्रमक भूमिका घेणार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. यावेळी उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनीही महिलांनी मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी कार्यक्रमास विजयप्रकाश ठोंबरे, पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख केज, दादासाहेब ससाने विधानसभा प्रमुख केज, दत्तकुमार काकडे युवासेना तालुकाप्रमुख केज, चंद्रशेखर बाप्पा मुकदम ज्येष्ठ नेते, अभिमान बापू पटाईत ज्येष्ठ नेते, आदित्य रांजणकर शेतकरी सेना जिल्हा कार्याध्यक्ष बीड, जयाताई राऊत तालुकाप्रमुख महिला आघाडी, वैशालीताई सांगळे शहर प्रमुख महिला आघाडी, आम्रपाली गजेशिव, विकास काशीद शिवसेना तालुका सचिव, महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख, योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले उप तालुकाप्रमुख, सुग्रीव बसवर उपतालुकाप्रमुख, ज्ञानेश्वर भांगे युवासेना उपतालुकाप्रमुख, शिवाजी गायकवाड युवासेना व उपतालुका प्रमुख, किशोर थोरात माजी सरपंच कुंभेफळ, अशोक सक्राते, सुनील पटाईत, शुभम आप्पा गंभीरे, श्रीराम कदम, शिवशंकर पाटील साबला, अमोल वळसे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, विश्वास जाधव, राजेभाऊ जाधव, पृथ्वीराज इंगळे, दिलावर सिंग गोके, किसन दादा कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### संघटना मजबुत तरच विजय : मुळूक

**केज तालुक्यात सुरू झालेला शिवसेनेचा विस्तार हा केवळ प्रारंभ असून, येत्या काळात आणखी शाखा स्थापन करून संघटन अधिक मजबूत करण्यात येणार आहे. संघटना मजबुत असेल तर विजय आपलाच आहे. यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने पक्षाच्या धोरणांनुसार काम करत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.**

## श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान येथे श्री स्वामी गंगाभारती महाराज पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न

**पिंपळवंडी (प्रतिनिधी):-** पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री. क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान ठिकाणी श्री. गंगा भारती मठात संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. गुरुवर्य महंत श्रीश्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षाप्रमाणे दि.७ एप्रिल रोजी श्री. स्वामी गंगाभारती महाराज संजीवन समाधी सोहळा (पुण्यतिथी) संत-महंत व मोठ्या संख्येने आलेल्या महिला-पुरुष भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी भजनी मंडळाने भजन साजरे केले.

भाविक-भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज व परमानंद भारती महाराज पिंपळवंडी, ह.भ.प. विष्णू देवानंद भारती महाराज मुनेश्वर संस्थान, ह.भ.प. संतोष भारती महाराज मुंगूसवाडा, ह.भ.प.महादेव भारती महाराज बेलेश्र्वर संस्थान, शिवानंद भारती महाराज, नारायण थोरवे महाराज, मधुकर पुरी यांच्या शुभहस्ते श्री. स्वामी गंगाभारती महाराज यांच्या संजीवन समाधी व मूर्तीचे विधिवत पूजन करून आरती गाऊन, पुष्पांजली वाहिली. या कार्यक्रम प्रसंगी महंत महादेवानंद भारती महाराज म्हणाले की, श्री. गंगाभारती मठ परिसरात २१ मजली इमारत बांधकामाचा शुभारंभ येत्या अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर (दि. १९ एप्रिल २०२६) आयोजित केला आहे. २१ मजली इमारतीच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा ठेवा व दर्शन होणार आहे. त्यामध्ये अनेक देवतांचे व पशुपती मंदिर, शिवलिंग पिंड, छत्रपती शिवाजी महाराज तसेच संत-महंत, महापुरुष, कर्तबगार महिलांच्या मूर्ती बसविण्यात येणार असून प्रत्येक मजल्यात स्वतंत्र मूर्ती राहणार आहेत. हे मंदिर भव्य दिव्य असणार व मूर्ती सुद्धा भव्य-दिव्य आकर्षित असतील, याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. या कार्यक्रमाला माजी जि.प. सदस्या अश्विनीताई जरांगे, सरपंच निलेश मोरे, अशोक जेथे, महेश खेंगरे, उद्धव शेठ पवार, दिलीप भराटे, उपसरपंच दादासाहेब, पवार, एम. डी. साबळे सर, माजी उपसरपंच दादासाहेब पवार, ग्रा.पं. सदस्य अशोक गुजर, सतीश पवार, बंडू पवार, बद्री पवार, पोपट शेळके, देविदास कापसे, भाऊसाहेब जरे, सुदाम पाटील, भास्कर पवार, आसाराम पवार, बंडू पोस्टमन, विठ्ठल पवार चेअरमन, शामराव पोकळे, कल्याण पवार, युवा नेते अशोक तात्या पवार, दादा बेद्रे, भागवत खरमाटे, उद्धव रहाटे, बाजीराव नाकाडे, भगवान काकडे, पन्हाळकर पोस्टमन, परमेश्वर सातपुते, नामदेव येवले, सिताराम नेमाने, बजगुडे महाराज, महादेव भवर, भागवत कापसे, बाळासाहेब पवार, तांबे फौजी, मत्रे मुकादम, दत्तात्रय जरे, गोकुळ राऊत, शंकर पवार, सांगळे गुरुजी, जालिंदर पवार, बाबू शिंदे, प्रशांत राऊत, काकडे महाराज, पुजारी नंदू बाघमारे, आश्रू वाघमारे, प्रशांत पवार, रामदास नाकाडे, संजय नाकाडे, श्रीकांत पवार, कैलास पवार, संदीप पवार, अशोक पोकळे, पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार, चंद्रकांत पवार, के.टी. पवार आदी सह परिसरातील ग्रामस्थ, भाविक-भक्त वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जमलेल्या भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीचा ज्युनियर एआयएस उपक्रम गाजला

**बीड (प्रतिनिधी):** विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमी तर्फे राबविण्यात आलेल्या ज्युनियर एआयएस उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमात सहभागी झालेल्या गौरंग काकडे याने १७८/२०० गुण मिळवत राज्यस्तरावर १० वा क्रमांक, तसेच जिल्हास्तरावर १० वा क्रमांक मिळवून गोल्ड मेडल पटकावले आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामुळे अकॅडमी व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सामान्यज्ञान, चालू घडामोडी, बुद्धिमत्ता चाचणी तसेच व्यक्तिमत्व विकास यांचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले. अकॅडमीचे संचालक यांनी सांगितले की, लहान वयातच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दिशा देणे हा आमचा उद्देश असून, अशा यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळते. गौरंग काकडे याचे या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे अकॅडमीतर्फे सांगण्यात आले.

# ग्राहकांना गॅस मिळाल्याचे ऑनलाइन मेसेज; सिलेंडर मात्र ऑफ लाईन गायब !

**बीड (प्रतिनिधी):-** पेट्रोल-डिझेल नंतर आता स्वयंपाकाच्या गॅस साठी ही ग्राहकांना मोठ्या त्रासास तोंड द्यावे लागत असल्याचा प्रकार बीड शहरातील गॅस वितरण करणाऱ्या वितरकांच्या कार्यालयात दिसून येऊ लागला आहे. ग्राहकांना गॅस मिळाल्याचे ऑनलाइन मेसेज येऊ लागले पण प्रत्यक्षात मात्र सिलेंडर ऑफ लाईन गायब होऊ लागले आहे. यामुळे ऑनलाइन व्यवहाराच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे मत एस. एम. युसूफ यांनी पत्रकातून व्यक्त केले आहे. सध्या इराण-अमेरिका या दोन देशांमध्ये

भयंकर युद्ध सुरू असल्याचा परिणाम आपल्या भारत देशात सुद्धा दिसू लागला



आहे. याचाच परिपाक म्हणून पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल मिळविण्यासाठी बाहन चालकांच्या लांबच लांब रांगा तर दिसत आहेत. शिवाय स्वयंपाक घर गॅस विना राहू नये म्हणून गॅस वितरक एजन्सी वर सुद्धा गॅस ग्राहकांच्या लांबच लांब रांगा दिसून येऊ लागल्या आहेत. या दोन्ही ठिकाणी लांबच लांच रांगा लागत असल्याने इंधन मिळविण्याकरिता कधी धकाबुक्की तर कधी बाचाबाची सुद्धा होऊ लागली आहे. हे कमी होते की काय म्हणून गॅस वितरकाकडे गॅस पाहिजे म्हणून ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर प्रथम तुमची नोंदणी पूर्ण झाली असल्याचा मेसेज ग्राहकांच्या मोबाईलवर येऊ लागला असून त्यानंतर काही दिवसांनी तुमच्या गॅस सिलेंडरची डिलिव्हरी पूर्ण होऊन तुम्हाला सिलेंडर देण्यात आले. असे मेसेजही ग्राहकांच्या मोबाईलवर धडकू लागले आहेत. गॅस सिलेंडर मिळविण्याकरिता अगोदरच नाकी नऊ येत असल्याने त्रासलेल्या ग्राहकांना या मेसेजने पुरते हैराण करून सोडले आहे. हा मेसेज आल्यानंतर जेव्हा संबंधित ग्राहक गॅस वितरकाकडे जाऊन मला तर गॅस सिलेंडर मिळाला नाही आणि मेसेज कसा आला? असा प्रश्न केला असता सुरुवातीला तर उडवाउडवीची उत्तरे देऊन गॅस ग्राहकांची बोळवण करण्यात येऊ लागली आहे तर काही कणखर व खमके गॅस ग्राहक यानंतर गॅस वितरण करत असलेल्या व्यवस्थापकासोबत किंवा एजन्सी मालकासोबत वस्तुस्थिती दाखवून आपला इंगा दाखवू लागले तेव्हा त्यांना गॅस वितरकाकडून निमुटपणे सिलेंडर देण्यात येऊ लागले आहेत. अशा ग्राहकांचे गॅस सिलेंडर नेमके कुठे जात आहेत? याचा सोक्षमोक्ष कोण लावणार? असे प्रश्न या अनुषंगाने पडू लागले आहेत असे एस. एम. युसूफ यांनी म्हटले आहे.

सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६

बीड सरकार



# बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करून आदर्श समाज निर्माण करा: पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो

## भव्य रॅली काढून पालवन चौक येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

बीड (सरकार) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर ममुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी दि.१३ एप्रिल सोमवार रोजी बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास पुज्य भिक्खु डॉ. इंदवंस्स महाथेरो (छ. संभाजीनगर), पुज्या भिक्खु धम्मशील थेरो (महाविहार धम्मभूमी शिवणी),पूज्य भिक्खु अश्वजित (छ. संभाजीनगर), पुज्य भिक्खु सुमेधबोधी (छ. संभाजीनगर) पुज्य भद्रेय (छ संभाजीनगर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालवन चौकापासून नागसेन बुद्ध विहारापर्यंत भव्य मिरवणूक काढून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली.



बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, सुशिलाताई मोराळे,ॲड भगवान कांडेकर, शितलकुमार सुकाळे, अजय सवाई, प्रा.विठ्ठल गाडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी समाज बांधवाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय प्रगतीसाठी क्रांती केली. बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म क्रांती केली व दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागताचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी सर्व आंबेडकरी अनुयायाची आहे. बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करून तथागताच्या धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी दर रविवारी उपासक-उपासिका यांनी बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन बुद्ध धम्माचे अनुकरण करणे सर्वांची जबाबदारी आहे. शांतीने जगण्यासाठी बुद्धाच्या तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची गरज आहे.

यावेळी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी राजू जोगदंड, शितलकुमार सुकाळे, मनोज नाना मस्के, संतोष जाधव, समाधान जाधव, बबन डोळस यांनी परिश्रम घेतल्याबद्दल सत्कार केला.यावेळी अच्युत उजगरे, डॉ. अमरेंद्र विद्याघर, उमाजी वाघमारे, प्रा.टी.जी. कांबळे ॲड.कल्याण गाडे, गौतम चोपडे, अभिमन्यू सोनवणे प्रमोद शिंदे (नगरसेवक), रणजित बनसोडे, शितल चक्रे (नगरसेवक), बाबासाहेब ओव्हाळ, आश्रूबा शिंदे, प्रशांत वासनिक, उत्तम पवार, ईश्वर धनवे, विनोद औसरमल, अशोक ठोकळ, सुमेध जोगदंड, गौतम जाधव, गौतम चक्रे, मनोज वाघमारे, अविनाश जोगदंड, कालिंदा मस्के,ॲड.सुरेश वडमारे, ॲड.जेतज वडमारे,ॲड.चंद्रवर्धन जाधव,ॲड. भाऊसाहेब भोसले, बाबुराव गालफाडे, काशिनाथ वाघमारे, उमाजी आठवले, राजेभाऊ गायकवाड, श्रीमंत उजगरे, रामचंद्र कसबे, धर्मराज वाव्हळे, मधुकर गायकवाड, प्रेम कांबळे, रवि वाघमारे, यांच्यासह या कार्यक्रमास सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच उपासक-उपासिका उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर,विश्वमाला इनकर यांनी केले.

# सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ

बीड (सरकार) हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.१२) एप्रिल २०२५ रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या २० वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास




माजी आ.राजेंद्र जगताप, सिराज देशमुख, सय्यद सलीम, मोईन मास्टर, शेख शफिक भाऊ, झहीर कादरी, सुशीलाताई मोराळे, जावेद कुरेशी, फारूक पटेल, अशोक लोढा,चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, बाळासाहेब पिंगळे, अश्फाक इनामदार, कामरान शेख, सय्यद आरशियान, आसाराम गायकवाड, प्रा. प्रदिप रोडे, रणजित क्षीरसागर, संदिप उपरे, शुभम धूत, नवनाथ शिराळे, सुहास पाटील, बबन वडमारे, अरुण भोले, अनिल घुमरे, शीतलकुमार सुकाळे, संतोष गायकवाड, डॉ.लक्ष्मण जाधव, संतोष मानूरकर, वसंत मुंडे, वैभव स्वामी, संदिप बेदरे, शेखर कुमार, अमर नाईकवाडे, सचिन चव्हाण, भीमराव दळे, मचिंद्र जोगदंड, भारत कांबळे, अमरेंद्र विद्यागर, सलाम शेठ, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दिपक कांबळे, प्रमोद दासूद, दशरथ सोनवणे, संदिपान डोंगरे, गौतम बचुटे, रवि जोगदंड, गोवर्धन वाघमारे, संतोष जाधव, बापू पवार, शाहू डोळस, जयदीप सवाई,मायाताई मिसळे, राणी गायकवाड, रेश्माताई जोगदंड, पठाण भाबी, शोभा गलांडे, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, अमोल धन्वे, सुभाष तांगडे, सतिश शिनगारे, दयानंद उजगरे, संभाजी गायकवाड, राहुल वाघमारे, राहुल सरवदे, अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, ॲड. श्रीकांत साबळे,मनोज वाघमारे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, रतन वाघमारे, बंटी वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

ईद-ए- मिलाफचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, किसन तांगडे, रमेश गंगाधरे, शेख रोहिल (नगरसेवक), मसूद खान (नगरसेवक) सिद्दीक फारोखी, सुलतान बाबा, रफिक भाई (फिटर) रणजीत शिनगारे, मुबीन जुबेरी, सादिक पठाण, शेख अजीम (मामू), फरहान बागवान आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.सुरेश वडमारे यांनी केले.

# मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा



बीड (सरकार): मुस्लिम समाजासाठी लागू असलेले ५ टक्के आरक्षण रद्द केल्याच्या निषेधार्थ येत्या १७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी सहकाऱ्यांसह जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर करून या मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच मुस्लिम समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी आयोजित या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी अत्यंत महत्त्वाची असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने या प्रश्नाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# अशोक माध्यमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती

वडवणी (सरकार) शनिवार दि.११ रोजी चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले



यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सावंत होते तर प्रमुख पाहुणे महादेव महादेव तुरे होते अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले व उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री महादेव तुरे सर यांनी जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी व समाज कल्याण ऑफिस कडून दिल्या जाणार्या विविध शिष्यवृत्ती व विद्यार्थ्यांसाठी विविध योजना तसेच बार्टी पुणे यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी असणार्या विविध योजनांची माहिती दिली .

अध्यक्षीय समारोप प्रसंगी माननीय श्री सावंत सरांनीही ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती व विद्यार्थ्यांसाठी असणार्या विविध योजनांची माहिती सांगितली श्री महादेव तुरे सर यांनी शाळेत उद्देशिका भेट दिली या या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सावंत मॅडम यांनी केले व आभार कोळपे सरांनी व्यक्त केले.

# बीडमध्ये ओपन स्पेसचे व्यवस्थापन कंपाउंड बांधकामासह गायरान जमिनींचे नियोजन करा

### भाजपचे नगरसेवक मनोज घोंगडे यांची बीड न.प. प्रशासनाकडे मागणी

बीड (सरकार)शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मनोज घोंगडे यांनी बीड नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकाम तसेच गायरान जमिनींच्या नियोजनाचा समावेश आहे.



निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील प्रत्येक वॉर्डमधील ओपन स्पेसची स्वतंत्र नोंद ठेवून त्याची माहिती संबंधित नगरसेवकांना देण्यात यावी. या जागांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांच्या हितासाठी या मोकळ्या जागांचा योग्य व नियोजनबद्ध वापर व्हावा, यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय, शहरातील प्रत्येक ओपन स्पेसभोवती कंपाउंड उभारण्यात यावे, जेणेकरून त्या जागांचे संरक्षण होईल आणि अतिक्रमणाला आळा बसेल. यामुळे शहराच्या नियोजनात शिस्त राहून नागरिकांना सुरक्षित मोकळी जागा उपलब्ध होईल. तसेच, शहरातील गायरान जमिनींवर घरकुलांसाठी भूखंड वाटप करताना प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. गायरान जमिनींचे वाटप करताना नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या तिन्ही मागण्यांची अंमलबजावणी झाल्यास शहरातील नियोजन, पारदर्शकता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, बीड नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# अत्यंत सुंदर,सुरमयी प्रवास थांबला

मुंबई (सरकार) ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने अत्यंत सुंदर, सुरमयी आणि रोमांचक प्रवास आज थांबला अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी भावपूर्ण श्ध्दांजली अर्पण केली.



ना. पंकजाताईंनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत आशाताईंच्या आठवणी जागवल्या. त्या म्हणाल्या,अत्यंत हरहुन्नरी कलाकार, आपल्या कलेमध्ये विविधता आणि सातत्याने नाविन्य जपून ठेवणाऱ्या, प्रत्येक सुरामध्ये एक ऊर्जा देणाऱ्या, अत्यंत आनंदी अशा व्यक्तिमत्वाच्या धनी,आमच्या आशाताई.. आज त्यांनी जगाचा निरोप घेतला.त्यांची अजरामर गाणी, त्यांचा सूर त्यांनी दिलेल्या प्रत्येक मुलाखती या सदैव भावी पिढीला प्रभावित करतील. एक अत्यंत सुंदर, सुरमयी आणि रोमांचक प्रवास आज थांबला आहे.आशाताईंना माझी भावपूर्ण श्द्धांजली आणि आदरांजली.

# के.एस.पी.विद्यालय येथे महात्मा जोतिराव फुले जयंती उत्साहात

बीड (सरकार): शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे महात्मा जोतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरवात केली. .

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, श्री राऊत एम. एन., विस्तार अधिकारी, शेख शाकेर सर, विशेष शिक्षक शाळेच्या मार्गदर्शक सौ.अंजलीताई शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

# जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.भारतकुमार सोळंके यांच्या हस्ते मानवजिगरा सोन्नर यांचा सत्कार; ९९ वेळेस रक्तदान

बीड (सरकार) येथील मानवजिगरा सोन्नर यांनी आजपर्यंत ९९ वेळेस रक्तदान करुन रुग्णांना रक्ताची मदत केल्यामुळे त्यांचे कौतुक करत जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.भारतकुमार सोळंके यांनी सोन्नर यांचे कौतुक करत राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व गुलाबाचे झाड देवून सन्मानित केले. यावेळी सत्काराला प्रतिउत्तर देतांना मानवजिगरा सोन्नर यांनी म्हटले की, मी यापुर्वी दि.०३ ऑगस्ट २०२१ रोजी मी मरणोत्तर बॉडी ऑर्गन डोनेट करण्याचे लिखित दिले आहे. ज्यामुळे मला माणूस म्हणून समाजासाठी काही केल्याचे सुख जाणवते. खरे पाहिले तर सत्कार्यासाठी शक्तीची नव्हे मानवधर्माची आवश्यकता आहे असे सांगितले.

याविषयी माहिती अशी की, शहरातील मानवजिगरा सोन्नर हे गेल्या अनेक वर्षांपासून स्वईच्छेने रक्तदान करत आले आहेत. कोरोनाच्या महामारीमध्ये लोक भितीपोटी घराबाहेर पडत नव्हते त्यावेळी देखील जिवाची पर्वा न करता लोकसेवेचे व्रत म्हणून मानवजिगरा सोन्नर यांनी सतत रक्तदान करीत राहीले.

बालपणापासूनच समाजसेवेची, नृत्याची व अभिनयाची आवड असल्याने गणपती उत्सवात व छोट्या मोठ्या कार्यक्रमातून मानवजिगरा सोन्नर यांनी आपली आवड जोपासली विविध नृत्य स्पर्धेत ३१



मानाची पारितोषिके मिळवून नृत्यामध्ये आपले वर्चस्व असल्याचे सिद्ध करुन दाखवले आहे. तसेच बीड फेस्टीव्हलच्या वैयक्तिक नृत्य स्पर्धेत त्यांनी हॅट्रीक मिळविलेली आहे. राज्यात पुणे, संभाजीनगर, लातूर, उजनी, धाराशिव, बीड, कळंब येथे त्यांनी प्रथम क्रमांकांची पारितोषिके मिळविली आहेत. २००५ मध्ये मुंबई येथे पु.ल.देशपांडे महाकरंडक, मराठवाडा लावणी महोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक तर रोटरी क्लब संभाजीनगरच्यावतीने झालेल्या कार्यक्रमात त्यांनी द्वितीय क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या अभिनयाची चमक दाखवून दिली आहे. तसेच सरगम म्युझिकमल नाईट सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या ग्रुप, हार्मेनी मेकर्स, सुहाने पल अशा ऑर्केस्ट्रात आपली कला सादर केली आहे. कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे लाईव्ह शो करुन त्यांनी रसिकांची मने जिंकली होती. तसेच मार्शल आर्टमध्ये देखील ब्लॅक बेल्ट प्राप्त झाला आहे व युट्युब चॅनलवर अशोका सोन्नर या नावने चॅनल देखील आहे. या सर्व कार्यक्रमाच्या माध्यमातून ते प्रत्येक ठिकाणी रक्तदानाचे आवाहन करत असतात. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यासोबतच कला, क्रीडा आणि सामाजिक संदेश देण्याचे कार्य एकत्रितपणे करणारे मानवजिगरा सोन्नर हे खरेच समाजासाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

# जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेचे आमदार होणार : शिंदे

## पक्षप्रवेश, संघटनबांधणी आणि मतदारयादी शुद्धीकरणावर भर

बीड (सरकार) शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत संपूर्ण बीड जिल्ह्यावर भगवा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेचे आमदार निवडून येतील असा ठाम आणि आत्मविश्वासपूर्ण दावा जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी केला.



आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने जिल्ह्यात संघटनात्मक ताकद वाढवण्यावर भर दिला असून जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात बैठकींचा धडाका सुरू आहे. गावपातळीपासून शहरांपर्यंत शिवसैनिक सक्रिय झाले आहेत. घराघरात शिवसेना ही मोहीम राबवली जात असल्याचे चित्र आहे. विविध पक्षांतील नाराज कार्यकर्ते आणि स्थानिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश करत असल्याने पक्षाची ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचा दावा शिंदे यांनी केला. यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जनसामान्यात असलेली लोकप्रियता शिवसेनेच्या बांधणीसाठी प्रभावीपणे उपयोगात आणली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मतदारयादी शुद्धीकरणावरही शिवसेनेने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. बीएलएच्या माध्यमातून पात्र नागरिकांची नावे मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात असून बोगस आणि संशयास्पद नावे वगळण्याचे काम हाती घेतले आहे. निवडणूक पारदर्शक आणि निष्पक्ष व्हावी, यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)